I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** अमरावती ग्रामीण **P.S. (पोलीस ठाणे):** अजनगांव **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0410 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/08/2026 02:09 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मंगळवार **Date from (दिनांक पासून):** 11/08/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 11/08/2026

**Time Period (कालावधी):** प्रहर ५ **Time From (वेळेपासून):** 12:14 तास **Time To (वेळेपर्यंत):** 13:35 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 12/08/2026 **Time (वेळ):** 01:30 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 001 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 12/08/2026 01:55 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** उत्तर, 1 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** पंचायत समिती कार्यालय , अंजनगाव

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्रीमती.निलिमा शालीग्राम सातव

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , अमरावती, अजनगांव, अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , अमरावती, अजनगांव, अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-8669000360

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. रविंद्र बाबुजी दारसिंबे | | | 1. Town/Village (शहर / गाव): कौसल्या विहार,धोतरखेडा,Tehsil (तहसील): ता अचलपुर,जि अमरावती,Police Station (पोलीस ठाणे): अजनगांव,District (जिल्हा): अमरावती ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपयाच्या चार नोटा एकुण 2000 रु | 2,000.00 |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 2,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

लेखी रिपोर्ट सरतर्फे:- श्रीमती.निलिमा षालीग्राम सातव, वय-38 वर्श, व्यवसाय - नोकरी, पद -

पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,अमरावती. मो-8669000360.

मी आज रोजी समक्ष ला.प्र.वि कार्यालय अमरावती येथे सरतर्फे फिर्याद देते की, मी वरील प्रमाणे ठिकाणी पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे.

दि.10/08/2026 रोजी मी ला.प्र.वि. अमरावती येथे कार्यालयात हजर असताना श्री. राजेष राठोड, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती यांनी तोंडी माहीती दिली की, तक्रारदार श्री. प्रविण दादाराव साखरे, वय - 53 वर्ष, व्यवसाय - नोकरी, पद-ग्रामपंचायत अधिकारी, बोराळा, ता. अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती रा. गाडगेबाबा षिक्षक कॉलनी, दर्यापुर, जि. अमरावती यांनी फोनद्वारे तोंडी तक्रार सांगीतली की, तक्रारदार ग्राम बोराळा, अतिरक्त हिरापुर ग्रामपंचायत, ता. अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती येथे ग्रामपंचायत अधिकार म्हणुन कार्यरत आहे. बोराळा येथे सुमारे 4 वर्शापासुन कार्यरत आहे. हिरापुर ग्रामपंचायत येथिल श्रिमती. कीरण बुरघाटे, ग्रामपंचायत अधिकारी हया सुटीवर असल्याने 19 जुन 2026 पासुन ते 3 आगस्ट 2026 पावेतो त्यांच्याकडे हिरापुर ग्रामपंचायत येथिल अतिरीक्त चार्ज होता.

हिरापुर ग्रामपंचायत अंतर्गत सावित्रिबाई फुले नगर मधे अनुसुचित जाती व नवबौध घटकांच्या वस्तीचा विकास योजना (दलित वस्ती सुधार योजना) मुंजुर कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम 2025 मधे मंजुर झाले. त्यानंतर रस्त्याचे काम जानेवारी 2026 मधे सुरू झाले व एप्रील मधे पुर्ण झाले.त्यावेळी सदर कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करणाÚया ठेकेदाराला जुलै 2026 मधे यांन तक्रारदार हे अतिरीक्त चार्जमधे असताना कामाचे देयके 2,17,420/-रू त्याला देण्यात आले. त्याबाबतची कागदोपत्री प्रक्रिया पुर्ण करून टिपणी बणवुन पंचायत समिती, पंचायत विभाग, अंजनगांव सुर्जी येथिल विस्तार अधिकारी पंचायत श्री. रविंद्र बाबुजी दारसिंबे यांची सही घेण्यासाठी तक्रारदार दि. 10/08/2026 रोजी दु. 4 वाजता पंचायत समिती, पंचायत विभाग, अंजनगांव सुर्जी येथे श्री. रविंद्र बाबुजी दारसिंबे यांचेकडे त्यांच्या कार्यालयात गेले असता त्यांनी टिपणीवर सही करण्यासाठी 2000/-रू ची मागणी केली. तेव्हा तक्रारदार यांनी पैसे देण्यास नकार दिल्यावर त्यांनी पैसे दिल्याषिवाय टिपणीच्या कागदपत्रांवर सही करणार नाही असे म्हटल्या तक्रारदारने नाइलाजास्तव त्यांना हो म्हणुन तेथुन निघुन आले. व तक्रारदार यांना रविंद्र बाबुजी दारसिंबे यांना 2,000/- रु. लाच रक्कम देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी फोनद्वारे सदर घडलेली हकीकत सांगीतली व आता पंचायत समिती कार्यालय बंद झाले असुन दि. 11/08/2026 रोजी श्री. रविंद्र बाबुजी दारसिंबे हे पुन्हा तक्रारदार यांना पैषांची मागणी करून त्यांच्याकडुन पैसे स्विकारतील असे सांगीतले. तसेच दि. 11/08/2026 रोजी अंजनगांव येथे जावुन तक्रार घेवुन कायदेषीर कार्यवाही करणेबाबत तोंडी आदेष दिला.

त्यावरून आम्ही तत्काळ अधिक्षक अभियंता, सवसु मंडळ, अमरावती यांना पत्र देवुन 1)श्री. विनोद माणिकराव भामकर, मुख्य तंत्रज्ञ 2)श्री. कैलास विनायकराव अंबाडकर, कनिश्ठ लिपीक. असे दोन सरकारी पंच बोलविले नमुद कर्मचारी दि.10/08/2026 रोजी 19.30 वा. ला.प्र.वि. कार्यालयात हजर आले. त्यावेळी आम्ही नमुद दोन्ही पंचांची ओळख करून आमची परस्परांषी ओळख करून दिली. त्यानंतर सदर दोन सरकारी पंचांना तक्रारदार व तक्रारदार यांनी दिलेल्या तोंडी तक्रारीताल हकीकत बाबत सांगीतले व उदया दि. 11/08/2026 रोजी अंजनगांव सुर्जी येथे पडताडणी कार्यवाही करणेकरीता जायचे असल्याने तषा पंचांना गोपनियतेच्या सुचना देवुन दि. 11/08/2026 रोजी

अंजनगांव सुर्जी येथे पडताडणी कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरले.

त्यानंतर दि. 11/08/2026 रोजी पो.कॉ.उपेंद्र थोरात यांना कार्यवाही करीता लागणारे सर्व साहीत्य घेण्यास सांगुन, आम्ही पो.नि.निलीमा सातव, पो.कॉ. उपेंद्र थोरात, पोहेकॉ. सुधिर चर्जन तसेच दोन पंच असे खजगी वाहन क्र. एमएच 48 एस 3661 ने अंजनगाव येथे अंदाजे स.09.00 वा. रवाना होवून तक्रारदाराचे सांगणेवरून दर्यापुर मार्गे जावुन अंजनगाव पासुन 1 कीमी आधी दर्यापुर अंजनगाव रोडवर अंदाजे 11.00 वा. पोहचलो. त्यावेळी एक व्यक्ती त्यांचे गाडी मारूती सुझुकी, वॅगनआर वाहन क्र.एमएच 30 पी 3599 या गाडीसह हजर होते. त्यावेळी आम्ही दोन्ही पंचासमक्ष त्यांना त्यांचे नाव, गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. प्रविण दादाराव साखरे, वय - 53 वर्ष, व्यवसाय - नोकरी, पद-ग्रामपंचायत अधिकारी, बोराळा, ता. अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती रा. गाडगेबाबा षिक्षक कॉलनी, दर्यापुर, जि. अमरावती असे सांगीतले त्यावेळी त्यांनी त्यांचा परिचय देवून आम्ही आमचा परीचय करुन दिला. त्यानंतर त्यांची एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबंधी तक्रार असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. प्रविण दादाराव साखरे यांना त्यांचे तक्रारी बाबत प्रथम सविस्तर विचारपूस केली. त्यांना त्यांची तक्रार स्वहस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगितले असता त्यांनी तक्रार स्वहस्ताक्षरात लिहुन तषी लेखी तक्रार आम्हास सादर केली. त्यावर पंच क्र.1 श्री. भामकर यांनी षेरा लिहुन दोन्ही पंचांनी तक्रार वाचुन तक्रारीवर सहया केल्या व समक्ष म्हणुन आम्ही सुध्दा सही केली व त्या संदर्भाने पडताळणी पुर्व पंचनाम्याची कार्यवाही करुन पडताळणी पुर्व पंचनामा करण्यात आला व लागलीच पडताळणी कार्यवाही करणेकरीता तक्रारदार यांचे जवळ व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन त्यांना पंच क्र.1 श्री. भामकर यांचेसह विस्तार अधिकारी श्री. रविंद्र बाबुजी दारसिंबे यांची भेट घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयामध्ये 12/14 वाजता रवाना केले. थोडयाच वेळात 12/34 वाजता ते परत आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व श्री. दारसिंबे यांच्यातील संभाशणाची क्लिप ऐकली असता त्यात तक्रारदार व श्री. दारसिंबे यांच्यात टिपणीबाबत बोलनी झाल्याचे दिसुन येत आहे त्यानंतर श्री. दारसिंबे यांनी तक्रारदार यांना म्हटले की,”फक्त मले दोन हजार रूपये“ त्यावर तक्रारदार बोलले की,”तुम्हाले किती दयायचे“ त्यावर श्री.दारसिंबे बोलले की,”हिरापुरचे माये...“ त्यावर तक्रारदार बोलले की,”हिरापुरच्या दलीत वस्तीचे“ त्यावर श्री.दारसिंबे बोलले की, ”मा हिस्स्याचे..., हाव“ त्यावर तक्रारदार बोलले की, ”बर..मंग सही आता करता की, नंतर“ त्यावर श्री.दारसिंबे बोलले की ” सही नंतर करेल न आताच. त्यावर तक्रारदार बोलले की, ”आपण दोन लाख सतरा हजाराचे दिले होते“ त्यावर श्री.दारसिंबे बोलले की ”हाव“ ”हं, आणि, ते तुम्ही म्हणता ते आजच करायच ते“ त्यावर तक्रारदार बोलले की, ”बर, हे फक्त दलीत वस्तीचे, हे हिरापुरचे, अनुसुचितचे हे तुमच्याकडे आहे.“ त्यावर श्री.दारसिंबे बोलले की ”आणले का“ त्यावर तक्रारदार बोलले की, ”दोन हजार, मी आणतो नं आता येवु ना“ त्यावर श्री.दारसिंबे बोलले की ”दया ना तेवढे आता, पैषाच काम आहे ना“ त्यावर तक्रारदार बोलले की, ”ठिक आहे ना, काही प्रॉब्लेम नाही“ त्यावर श्री.दारसिंबे बोलले की ”पाकीटात देवुन देजा फक्त“ त्यावर तक्रारदार बोलले की, ”ठिक“ असे बोलुन तक्रारदार हे पंचासोबत तेथुन निघुन परत आले. तेव्हा पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री.दारसिंबे यांनी तक्रारदार यांना पंचासमक्ष लाच रक्कम मागीतल्याचे निश्पन्न झाले.त्यानंतर पडताडणी पंचनामा करण्यात आला. त्यांनतर श्री.दारसिंबे यांचेवर सापळा कारवाई करायची असल्याने तक्रारदार यांना लाचेची रक्कम 2,000/-रू हजर करण्यास सांगीतले असता

त्यांनी 2,000/- रुपये ज्यामध्ये 500 रुपये दराच्या 4 नोटा हजर केल्या. त्या नोटांचे क्रमांक आम्ही पंच क्र.1 श्री. भामकर यांना वाचण्यास सांगुन पंच क्र.2 श्री. अंबाडकर यांना को-या कागदावर क्रमांक लिहिण्यास लावले व त्यावर पंचांनी व आम्ही  सहया केल्या.

त्यांनतर आमच्या सुचनेवरून स्टाफ सुधीर चर्जन यांनी तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटाला ॲन्थ्रासीन पावडर लावुन प्रात्यक्षिक करून तसेच तक्रारदार व पंचाना अल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहीती दिली व सापळापुर्व पंचनामा करण्यात आला. त्यानंतर सापळा पंचनाम्यादरम्यान हजर केलेल्या लाच रक्कमेला अँथ्रासिन पावडर लावुन लाच रक्कम तक्रारदार यांच्या षर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवुन दिली. व पोकाॅ. उपेंद्र थोरात यांनी व्हाईस रेकाॅर्डर सुरु करुन देवून तक्रारदार व पंच क्र.1 श्री. भामकर यांना तक्रारदार यांच्या चारचाकी वाहनाने श्री.दारसिंबे यांची भेट घेण्याकरीता पंचायत समिती, अंजनगांव सुर्जी, अमरावती येथेे रवाना केले.

त्यानंतर आम्ही व सापळा पथकातील इतर अधिकारी व कर्मचारी हे वाहनाने पंचायत समिती, अंजनगांव सुर्जी कार्यालयाच्या आजुबाजुला आडोसा घेवुन थांबले. तेव्हा तक्रारदार व पंच क्र.1 श्री.भामकर पंचायत समिती, अंजनगांव सुर्जी कार्यालयात विस्तार अधिकारी पंचायत श्री. रविंद्र बाबुजी दारसिंबे यांच्या रूममधे गेले व काही वेळातच रूमच्या बाहेर येवुन सापळा पथकास लाच स्विकारल्याबाबत पुर्व नियोजित इषारा केला. त्यावेळी आम्ही सर्वजण जावुन विस्तार अधिकारी पंचायत श्री. रविंद्र बाबुजी दारसिंबे यांना ताब्यात घेतले. त्यावेळी आम्ही श्री. दारसिंबे यांना पंचाचा व सापळा पथकातील अधिकारी/कर्मचारी यांचा परिचय करून दिला. तेव्हा पोषि उपेंद्र थोरात यांनी तक्रारदार जवळील व्हाईस रेकाॅर्डर काढुन बंद केला. त्यानंतर आम्ही विस्तार अधिकारी पंचायत श्री. रविंद्र बाबुजी दारसिंबे यांना त्यांचे नाव,पद,व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. रविंद्र बाबुजी दारसिंबे, वय 52 वर्शे, पद - विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती, रा. कौसल्या विहार, धोतरखेडा, ता. अचलपुर, जि. अमरावती असे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदारा कडुन स्विकारलेली लाच रक्कम जी श्री.दारसिंबे यांनी त्यांचे षर्टचे डावीकडील खिष्यामध्ये ठेवलेली होती ती लाच रक्कम आमच्या सुचनेवरून पंच क्र.1 श्री. भामकर यांनी श्री.दारसिंबे यांचेकडुन ताब्यात घेतली. त्यानंतर केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर सापळा पंचनामा केला.

तरी, विस्तार अधिकारी पंचायत श्री. रविंद्र बाबुजी दारसिंबे, पंचायत समिती, अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती यांनी दि. 11/08/2026 चे 12/14 वा पासुन पडताडणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार श्री. प्रविण दादाराव साखरे यांचे अनुसुचित जाती व नवबौध घटकांच्या वस्तीचा विकास योजना (दलित वस्ती सुधार योजना) मुंजुर काॅंक्रीट रस्त्याचे बांधकामाचे टिपणीच्या कागदपत्रांवर सही करून कागदोपत्री प्रक्रीया पुर्ण करण्यासाठी  2,000/-रू लाचेची मागणी करून रक्कम स्विकारन्याचे मान्य केले व दि.11/08/2026 रोजी सापळा कार्यवाही दरम्यान 2,000/- रुपये लाचेची रक्कम वेळ अंदाजे 13.21 वा. ते 13.35 वा. च्या दरम्यान पंचायत समिती, अंजनगांव सुर्जी येथील सहायक गटविकास अधिकारी यांच्या रूम मध्ये स्विकारल्याने श्री. रविंद्र बाबुजी दारसिंबे, वय 52 वर्शे, पद - विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती, रा. कौसल्या विहार, धोतरखेडा, ता. अचलपुर, जि. अमरावती यांचे विरूध्द माझी कायदेषिर फिर्याद आहे.लेखी रिपोर्ट वरुन

माझी वरिल प्रमाणे फिर्याद लॅपटाॅपवर टाईप केली असुन त्याची प्रिंट काढूण ती मी वाचुन पाहीली, माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी टाईप केली आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** SURAJ PURUSHOTTAM BONDE (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SURAJ PURUSHOTTAM BONDE

**14.**

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** 16501001669SPBM7701Z

**Signature / Thumb impression of the complainant / informant**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15.** **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी)) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** |
| 1 | पुरुष | 1974 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग / वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| **8** | **9** | **10** | **11** | **12** | **13** |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| **14** | **15** | **16** | **17** | **18** | **19** | **20** |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**